**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** धाडगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0200 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 08/06/2026 21:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 08/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/06/2026
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 08/06/2026 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 08/06/2026 21:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, धडगाव,धडगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** धाडगांव
**District(State) (जिल्हा(राज्य)):** नंदुरबार(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विकास शिवाजी लोंढे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाम,नंदुरबार,नंदुरबार,धाडगांव,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाम,नंदुरबार,नंदुरबार,धाडगांव,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588029368

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | खाअल्या सिंगा पाडवी | | | 1. कनिष्ठ सहायक वर्ग 3,पंचायत समिती,धडगाव,धडगाव, धाडगांव,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची स्विकारलेली रक्कम 500 | 500.00 |

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहबाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी विकास षिवाजी लोंढे, वय 36 वर्षे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 758829368

सरकारतर्फे फियादी होवुन फियाद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील 01 वर्शापासुन पोलीस निरिक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनाक 03/06/2026 रोजी तक्रारदार श्री. राकेष रामा पावरा, वय 30 वर्षे, रा. जुनी मुंगबारी, पो.धनाजे बु. ता.धडगांव,जि.नंदुरबार यांनी फोनद्वारे ला.प्र.वि. नंदुरबार कार्यालयातील पोना/सुभाष पावरा यांच्याशी संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबंधी तक्रार असल्याचे सांगुन आपण दिनाक 04/06/2026 रोजी धडगाव येथे येवुन कारवाई करणेबाबत विंनती केली. नमुद तक्रारीबाबत पोना/सुभाश पावरा यांनी आम्हास हकीकत सांगीतली. त्याप्रमाणे आम्ही दिनाक 04/06/2026 रोजी तहसीलदार, तहसील कार्यालय, षहादा यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन दोन पंच षहादा येथे उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही आमचे स्टाफ पोलीस अंमलदार पोना/हेमंतकुमार महाले, पोना/सुभाश पावरा यांना सुचना देवुन सापळा कारवाईसाठी लागणाÚया साहित्यासह तसेच दोन्ही पंच असे षासकीय वाहन क्रमांक एम.एच.39 अ◌े. क्यु. 4873 ने ला.प्र.वि., नंदुरबार येथुन प्रकाषा मार्गे षहादा येथे गेलो तेथुन दोन पंचाना घेवुन षहादा-काकडदा या मार्गाने धनाजे खुर्द येथे धनाजे-धडगाव रोडावर मोकळया जागी पोहचलो. सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होते. त्यास आम्ही षासकीय वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर आम्ही त्यांस नाव, पत्ता विचारुन खात्री केली असता तो तक्रारदार राकेष पावरा असल्याची खात्री झाली. त्यानंतर आम्ही, तक्रारदार राकेष पावरा यांना पंच, सापळा पथकातील अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. राकेष रामा पावरा, वय 30 वर्षे, व्यवसाय - सिक्युरिटी गार्ड, युनिक डेल्टा फोर्ज, कासारवाडी,पुणे, रा. जुनी मुंगबारी, पो.धनाजे बु. ता. धडगांव,जि.नंदुरबार असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार राकेष पावरा यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, श्माझे काका श्री. बळीराम काल्या पावरा, 50 वर्षे, रा. जुनी मुंगबारी हे अषिक्षित असल्याने मी सन 2024 मध्ये त्यांचेकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीर बांधकाम करणेकामी अनुदान मिळणेकरीता प्रस्ताव तयार करुन पंचायत समिती,धडगांव येथे सादर केला होता. त्यानंतर सदर प्रस्तावास पंचायत समिती कार्यालय, धडगांव कार्यालयाकडून दिनाक 21/02/2025 रोजी तांत्रिक मान्यता देण्यात येवून दिनाक 27/03/2025 रोजी 4,99,661/- रु.अनुदान मंजूर करण्यात आले होते.

दिनाक 22/05/2026 रोजी गावी आल्यावर मी माझे काका श्री.बळीराम काल्या पावरा यांचेकडे त्यांना विहीरीचे अनुदान मिळाले किंवा कसे याबाबत विचारले असता त्यांनी 1,62,604/- रु.अनुदान रक्कम मंजुरी प्रस्ताव अद्याप मंजूर झाला नसल्याचे मला स◌ागुन पंचायत समिती कार्यालय, धडगांव येथे जावून सदर प्रस्ताव मंजूरीबाबत चौकषी करण्यास सांगितले. त्यानुसार मी प्रलंबित अनुदान मंजूरी प्रस्तावाची चौकषी करण्यासाठी काल दिनाक 03/06/2026 रोजी पंचायत समिती कार्यालय, धडगांव येथे गेलो व तेथील अकाऊंटंट यांना भेटलो असता त्यांनी माझे काकांचा अनुदान मंजूरी प्रस्ताव त्यांचे समोरचे टेबलवर काम करीत असलेले कनिष्ठ सहायक यांचेकडे असून त्यांना भेटण्यास सांगितले. त्यानुसार मी कनिष्ठ सहायक यांना भेटून माझे काकांचे प्रलंबित अनुदान मंजूरी

प्रस्तावाबाबत विचारणा केली असता त्यांना सदर प्रस्तावावर विस्तार अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे सांगून विस्तार अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून देण्यासाठी माझेकडे 1000 रु. रकमेची मागणी केली आहे. सदर लाचेची रक्कम दिली नाही तर माझे काकांचे विहीरीचे अनुदानाचे काम होणार नाही, अषी माझी खात्री झाल्याने, मी माझे ओळखीचे अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाचे पोलीस सुभाष पावरा यांना फोनव्दारे संपर्क करुन आमचे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगीतली व त्यांना पुढील कार्यवाहीसाठी दिंनाक 04/06/2026 रोजी धडगाव येथे येण्याची विंनती केली. त्याप्रमाणे आज दिंनाक 04/06/2026 रोजी आपण, आपला स्टाफ व दोन्ही पंच असे धडगाव येथे आले.

मला पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथील कनिष्ठ सहाय्यक यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही तसेच त्यांचेत व माझेत पुर्व वैमनस्य तसेच कोणत्याही प्रकारचा पुर्व व्यवहार व आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहाराचा नाही. आज दिंनाक 04/06/2026 रोजी मला माझे काकांचे विहीरीचे अनुदान मंजुरीचे प्रस्तावाचे कामाबाबत विचारपुस करण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथे जावयाचे आहे. तरी आपण माझेकडुन 1000/- रुपये लाचेची मागणी करणारे पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथील कनिष्ठ सहाय्यक यांच्या विरुध्द कायदेषीर कारवाई करावी बाबत विंनती केली होतीश्

त्यानुसार आज दिंनाक 04/06/2026 रोजी मी व माझेसोबत अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबारचा स्टाफ व दोन पंच असे तक्रारदाराने सांगतलेल्या ठिकाणी धनाजे खुर्द गावातील धनाजे-धडगाव रोडवरील मोकळया जागेत आलो. त्यावेळी तक्रारदाराने दोन पंचासमक्ष वरील प्रमाणे लेखी तक्रार लिहुन दिली आहे.

सदर तक्रारीबाबत तक्रारदाराने यापुर्वी त्याचे काका श्री. बळीराम पावरा यांचेषी चर्चा केली असता त्यांनी तक्रारदारास नमुद कामासंदर्भात सर्व प्रकारचे निंणय घेण्याचा अधिकार दिलेला आहे. तरी तक्रारदाराने त्याचेकडून 1000/- रुपयांची लाच मागणारे कनिश्ठ सहाय्यक यांचेवर कायदेषीर कारवाई करावी बाबतचीं तक्रार स्वःहस्ताक्षरात सविस्तर लिहुन दिली होती.'' त्यावर तक्रारदार राकेष पावरा, आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या होत्या.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार राकेष पावरा व पंच क्र. 1 श्री. हरिश नुक्ते यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोना/हेमंतकुमार महाले यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार अनिल राठोड यांचे शर्टाचे आत बनियनला लेसच्या सहाय्याने अडकवुन तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने 15.26 वा. रवाना केले होते.

तक्रारदार श्री. राकेष पावरा व पंच क्र.1 श्री हरिश नुक्ते हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोना/हेमंतकुमार महाले यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र.1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व कनिश्ठ सहाय्यक यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये कनिश्ठ सहाय्यक खाअल्या पाडवी यांनी तक्रारदार यांचेकडुन तक्रारदार यांचे काकांचे महात्मा गांधी राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीर बांधकाम करणेकामी अनुदाने मिळण्याचे प्रस्तावावर विस्तार अधिकारी यांची सही घेवुन आणुन देण्याचे मोबदल्यात प्रथम 1000/- रूपये लाचेची मागणी करुन व तडजोडीअंती 500/- रूपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळापथकाची खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

तक्रारदार श्री. राकेष पावरा यांनी सांगीतले की, त्यांचे पत्नीची प्रकृती खराब झाली असल्याने तिला वैद्यकीय उपचारासाठी घेवन जाणे असल्याने पुढील कार्यवाही सोमवारी म्हणजेच दिंनाक 08/06/2026 रोजी करावी बाबत विंनती केल्याने सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही दिंनाक 08/06/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे आज दिंनाक 08/06/2026 रोजी आम्ही व सापळा पथकातील सदस्य पोहवा/विजय ठाकरे, पोना/हेमंतकुमार महाले, पोना/सुभाश पावरा, चालक पोहवा/जितेंद्र महाले असे ला.प्र.वि. कार्यालय, नंदुरबार येथुन शासकीय वाहन क्रमांक एम. एच. 39 ए.क्यु. 4873 हिचेने सापळा कारवाईकामी लागणारे सर्व साहित्य घेवुन रवाना झालो. त्यानंतर दोन्ही पंचाना षहादा येथुन घेवुन षहादा -काकडदा मार्गे धडगाव गावातील पी.पी. पराडके कन्या महाविद्यालय येथे 13ः00 वाजेच्या सुमारास पोहोचलो. सदर ठिकाणी पूर्वसूचना दिल्याप्रमाणे तक्रारदार श्री. राकेष पावरा उपस्थित होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार राकेष पावरा यांना कनिश्ठ सहाय्यक खाअल्या पाडवी यांचे मागणीप्रमाणे 500/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. त्यांनी लाच म्हणुन देण्याकरीता त्यांचे काकांचे षेतीच्या बचतीतुल आणलेले 500/- रुपये त्यात 500/- रुपये दराची 01 चलनी नोट हजर केली. आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. 2 संदिप बोरसे यांनी सदर नोटांचे नंबर एका कोÚया कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर पोना/सुभाश पावरा यांनी सदर लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोट तक्रारदार यांचे शर्टाचे डाव्या बाजुकडील पुढील खिषात व्यवस्थित ठेवुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार राकेष पावरा व पंच क्र. 1 श्री. हरिश नुक्ते यांचेसह लाचेची रक्कम घेवुन पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथे पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार राकेष पावरा यांचे शर्टाचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना धडगाव गावातील पी.पी. पराडके कन्या महाविद्यालय येथुन पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मोटार सायकलच्या मागोमाग षासकीय वाहनाने रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार राकेष पावरा व पंच क्र.1 हरिश नुक्ते असे पंचायत समिती कार्यालय, धडगाव येथे पोहचले. त्यानंतर आम्ही षासकीय वाहन सदर ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवुन सदर पंचायत समिती कार्यालयाचे आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत 14.55 वा. सापळा पथकास इषारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने कनिश्ठ सहाय्यक खाअल्या पाडवी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोहवा/विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या कनिश्ठ सहाय्यक खाअल्या पाडवी यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव खाअल्या सिंगा पाडवी, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कार्यालय, धडगाव रा. कुंडल ता.धडगाव जि. नंदुरबार असे सांगितले.

तरी दिनांक 04.06.2026 रोजी लोकसेवक खाअल्या सिंगा पाडवी, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कार्यालय, धडगाव रा. कुंडल ता.धडगाव जि. नंदुरबार यांनी तक्रारदार राकेष पावरा यांचे काकांचे महात्मा गांधी राश्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीर बांधकाम करणेकामी अनुदान मिळण्याचे प्रस्तावावर विस्तार अधिकारी यांची सही घेवुन आणुन देण्याचे मोबदल्यात तक्रारदार राकेष पावरा यांचेकडे प्रथम 1000/- रूपये व तडजोडीअंती 500/- रूपये लाचेची मागणी करून दिनांक 08/06/2026 रोजी सदरची लाच रक्कम 500/- रुपये पंच क्र. 1 यांचेसमक्ष पंचायत समिती कार्यालय धडगाव येथील अर्थ विभागात स्विकारली, म्हणुन त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिंयाद आहे.

माझी वरील फिंयाद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajendra Hirachand Jagtap(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
धडगाव पोलीस स्टेशन
जिल्हा नंदुरबार

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Hirachand
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):